ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# "सुधीर मुनगंटीवार यांचे राजकीय सामाजिकरणाचे कार्य : एक चिकित्सक अध्ययन"

दैवत रघुनाथ बोरकर[१] , प्रा. डॉ. नंदाजी राघोबाजी सातपुते[२]
[२] महिला महाविद्यालय, गडचिरोली

## १.० प्रस्तावना



राजकारण ही केवळ तर्काची अथवा कायद्याची बाब नाही, तर समाज हे त्याचे रणांगण आहे. समाजातील स्तर, वर्ग, जाती, संघटना व विविध आर्थिक गट—त्यांची धोरणे व त्यांची सापेक्ष शक्ती हे त्यातील खाच—खळगे आहेत. त्याचप्रमाणे, मानवी मन व त्याचे ज्ञान—अज्ञान हेतू यांतील प्रेरक शक्ती आहे. राजकारणातील विविध व्यक्तींच्या अंगी असलेले विविध ग्रण त्यांची राजकारणातील यश निर्धारीत करीत असते. वरील माहितीच्या अनुशंगाने, कोणत्याही राजकीय नेत्याचा राजकीय दृ ष्टीकोनातून अभ्यास करीत असतांना त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली हे पाहण्याकरिता त्यांचा जीवनवृत्तांत जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. समाजातील कार्यक्षम व्यक्तींचे ज्यावेळी अशा दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते, त्यावेळी असे दिसून येते की, काही व्यक्ती या जन्मत:च थोर असतात तर काही व्यक्ती स्वत:च्या कर्तृत्वाने व अंगच्या गुणांनी थोर पदास पोहोचतात.

सामान्य माणूस देखील असामान्यत्वाप्रत आपल्या अविरत सेवेने व कर्तृत्वाने उच्च पदापर्यंत पोहचू शकतो. त्याने केलेले कार्य, त्यांचे राजकीय नेतृत्व योगदान बहुआयामी असल्याने अशा व्यक्तिंच्या कामाची लोकांना जाणीव करुन देऊन इतर लोकांनी त्यापासून प्रेरणा घेऊन त्यांचे कार्य पुढे चालू ठेवावे या उद्देशाने तसेच त्याचे उत्कृष्ट आणि आदर्श उदाहरण आजच्या काळाला देण्यासारखे म्हणजे श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे व्यक्तीमत्व होय. याच कारणाने श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे राजकीय सामाजिकरणाचे कार्य याचा चिकित्सक अभ्यास या संशोधनकार्यात करण्यात आला आहे.

## २.० संशोधन पद्धती

संशोधनाची कार्यपद्धती संशोधनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या निष्कर्षात पोहोचण्यासाठी प्रथम योग्य आणि उपयुक्त संशोधन पद्धतीचा विचार करण्यांत येतो. या कारणाने प्रस्तुत संशोधनकार्यात ग्रथंलयीन संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला. या कार्यात वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सामाजिक विकासाच्या अनुशंगाने केलेल्या राजकीय कार्याचा चिकित्सक अभ्यास करण्याकरीता विधिमंडळातील कार्याचा मागोवा घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी मुख्यत: उपलब्ध साहित्य, निरीक्षण, चर्चा इत्यादी पद्धतींचा अवलंब करण्यात आला.

## २.१ संशोधनाची भौगोलिक मर्यादा व व्याप्ती

प्रस्तूत संशोधनात श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या क्षेत्रातील म्हणजेच विदर्भाच्या चंद्रपुर जिल्ह्यातील त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये त्यांच्या सामाजिक, पर्यावरण, शैक्षणिक, औद्योगिक व आरोग्य क्षेत्रातील कार्याचा समावेश करण्यात आला आहे.

## २.२ तथ्य संकलन

संशोधनाचा विषय "सुधीर मुनगंटीवार यांचे राजकीय सामाजिकरणाचे कार्य : एक चिकित्सक अध्ययन" हा आहे. यासंदर्भात आवश्यक माहिती मिळविण्यासाठी प्रमुख्याने दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला. याकरीता विविध दैनिक, साप्ताहिके, मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके व इतर प्रकाशित शासकीय दस्तावेजांचे अध्ययन केले गेले. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत प्रकाशित साहित्याचे आशय विश्लेषणाच्या दृष्टीकोनातुन परीक्षण करण्यात आले.

## २.३ माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :

संशोधन कार्य करतांना संकलित केलेल्या माहितीचे सूक्ष्म आणि सखोल अध्ययन करण्यात आले. संकलीत केलेल्या माहितीचे सर्वप्रथम सारणीकरण करण्यात आले. नंतर त्याचे वर्गीकरण तालिकावार आणि घटकवार करण्यात आले, अशा प्रकारे तालिकेत भरण्यात आलेल्या माहितीचे पृथ:करण योग्य त्या तंत्राचा उपयोग करुन करण्यात आले व त्या परिणामांच्या आधारे निष्कर्ष काढण्यात आले. वरील सर्व प्रक्रियानंतर निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील यांची दखल घेण्यात आली.

## ३.० संकलित माहितीचे विश्लेषण व प्रस्तुतीकरण

राजकीय सामाजिकरण ही विकसनशील प्रक्रिया आहे. मानवी जीवनाच्या बाल्यावस्थेपासून ती सुरू होते. प्रौढावस्थेत ती आकारास येते आणि व्यक्तीच्या मृत्युपर्यंत ती सतत चालते. निरनिराळया अवस्थांमधून ते राजकीय सामाजिकरण व्यक्तिमनावर कोणते परिणाम घडविते? किंवा सामाजिकरणाचा विकास कसा झाला? हे पुढील मुद्यावरून स्पष्ट होण्या मदत होते.

## ३.१ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे बालपण व राजकारण प्रवेश

३० जुलै १९६२ रोजी सुधीर मुनगंटीवार यांचा जन्म झाला. वडील उच्च विद्या विभूषित. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जुळलेले आहेत बालवयातच मुनगंटीवार यांची जडणघडण याच विचारात झाली. पुढे महाविद्यालयीन जीवनात अनेक पदव्या त्यांनी आपल्या नावे केल्या. वकिली, पत्रकारिता, व्यावसथापन पदविका आदींचे त्यांनी शिक्षण घेतले. महाविद्यालयीन जीवनात असतानाच त्यांनी विद्यार्थी चळवळीत काम करणे सरू केले १९७९ मध्ये चंद्रपुरातील सरदार पटेल महाविद्यालयाच्या छात्रसंघाच्या निवडणुकीच्या माध्यमातून त्यांच्या राजकीय जीवनाला प्रारंभ झाला त्यांच्या नेतृत्त्वाची जडणघडण इथून झाली. ते छात्रसंघाच्या निवडणुकीत सचिवपदी निवडून आले. पुढे भारतीय जनता पक्षाशी जुळले.

## ३.२ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे अंगगुण व त्याचा राजकारणावर प्रभाव

सुधीर मुनगंटीवार हे वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाचे धनी आहेत. या त्रिसूत्रीचा चाणाक्षपणे वापर करुन त्यांनी जनसामान्यांचे प्रश्न सोडविले आणि त्यांच्या हृदयात स्थान मिळविले. त्यामुळे सलग पाचवेळा त्यांना जनतेने विधानसभेत पाठविले. भाजपच्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचा विचार करता सुधीर मुनगंटीवार हे पक्षाचा विचार, जातिधर्म यांच्या पलीकडे पोहोचलेले लोकप्रतिनिधी आहेत. मुळात ते निवडणुकीत भाजपचे उमेदवारच नसतात, तर ते जनतेचे प्रतिनिधी म्हणूनच निवडणूक लढवितात, त्यामुळे सलग पाचवेळा प्रचंड बहुमताने त्यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली. मुनगंटीवारांची अभ्यासूवृत्ती, लोकतप्रियता ही विधिमंडळ सभागृहापर्यंतच मर्यादित राहिली नाही, तर त्यांच्या नेतृत्वाची दखल घेत पक्षाने त्यांना महाराष्ट्राची जबाबदारी सोपविली आहे. मुनगंटीवारांची काम करण्याची शैलीच वेगळी आहे. त्यांच्या कार्यालयात गेलेली कोणतीही व्यक्ती निराश होऊन परतत नाही. स्वत: मुनगंटीवार कार्यालयात बसून

मतदारांच्या समस्या समजून घेतात. त्या समस्यांची तत्काळ सोडवणूक व्हावी, यासाठी प्रयत्न करतात. प्रश्न सुटेपर्यंत त्याचा पाठपुरावा करतात. मुनगंटीवार हे कोणत्याही कामाचा पाठपुरावा कसा करतात, हे त्यांनी अनेकदा कागदपत्रे सादर करुन दाखविले आहेत. त्यामुळेच माहितीच्या अधिकाराचा कायदा त्यांनी स्वत:ला लावून घेतला आहे. त्यांच्या कार्यालयातून माहितीच्या अधिकारात कोणतीही कागदपत्रे मागता येतात. अशाप्रकारे स्वत: पारदर्शी असल्याचा पुरावा देणारे राज्यातील ते एकमेव लोकप्रतिनिधी आहेत. हेच त्यांच्या यशाचे आणि लोकप्रियतेचे गमक आहे.

## ३.३ श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या विविध क्षेत्रातील कार्याचा आढावा

चंद्रपूर जिल्हा भाजपचे एक समर्थ व सशक्त नेतृत्व म्हणून आमदार सुधीर मुनगंटीवार सर्वपरिचित आहेत. तसेच जिल्ह्यात विकासाचा झंझावात आणणारे एक जागरुक, सक्रिय व धाडसी आमदार म्हणूनही त्यांनी आपली प्रतिमा जोपासली आहे. मतदारांशी स्नेहाचे नाते निर्माण करणारा व कष्टकरी अन्यायग्रस्त गरिबांसाठी झटणाऱ्या जनप्रतिनिधींच्या रुपातही आमदार मुनगंटीवार यांना ओळखले जाते. सामान्य जनतेशी बांधीलकी राखून उत्तम राजनैतिक कर्तव्य बजावणारे मुनगंटीवार हे जरी भाजपचे आमदार असले, तरी त्यांचे चाहते सर्वत्र आहेत. आपल्या अडचणी, समस्या, तक्रारी घेऊन येणाऱ्यांमध्ये सर्वच जातिधर्म, भाषा, संप्रदाय, समाजाचे लोक असतात. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या विविध क्षेत्रातील कार्याचा आढावा शोधनिबंधाच्या या भगात प्रस्तुत करण्यात येत आहे.

### ३.३.१ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे सामाजिक कार्य

- झटपट लॉटरीच्या विक्रीवर बंदी घालण्याबाबत अर्धा तास चर्चा
- हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिरात फलक लावण्यास प्रतिबंध घालण्यासाठी अशासकीय विधेयक
- चंद्रपूर शहरतील पुनम खांडरे नरबळी प्रकरणाला लक्षवेधी सूचनेद्वारे वाचा फोडली. शासनाने प्रकरण चौकशीसाठी सीआयडीकडे सोपविले.
- राज्यातील आदिवासींचे २०० कोटी रुपयाचे खावटी कर्ज माफ करण्याबाबत अर्धा तास चर्चेद्वारे शासनाचे लक्ष वेधले (शासनाने खावटी कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला).
- वनजमिनीवर अतिक्रमण करून शेती करणाऱ्या नागरिकांना शेतजमिनीचे स्थायी पट्टे मिळण्याबाबत अर्धा तास चर्चा (चर्चेदरम्यान दिलल्या आश्वासनानुसार गाव समिती स्थापन करण्याचा शासनाचा निर्णय).
- राज्यातील सर्व नागरिकांना समान नागरी कायदा लागू करण्याबाबत अशासकीय ठराव.
- राज्यातील अपंग व्यक्तींच्या कल्याणाकरिता आणि पुर्नवसनाकरिता तरतूद करावी यासाठी अशासकीय विधेयकाच्या चर्चा (चर्चेदरम्यान दिलेलया आश्वासनानुसार अपंग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली).
- मातंग समाजासाठी स्वातंत्र्य आयोग नेमण्यात यावा या मागणीसाठी अर्धा चर्चा चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासन (आश्वासनानुसार मातंग समाजासाठी स्वतंत्र्य आयोग नेमण्यात आला).
- राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्तांना पेन्शन लागु करणे, विधवांना मोफत पास, पाल्यांना नोकऱ्या आदी विषयाबाबत अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून प्रयत्न.
- संजय निराधार योजना व सामाजिक अर्थसहाय्याच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यात यश (अशासकीय विधेयकावर चर्चा घडवून त्या माध्यमातून शासनाला निर्णय घेण्यास भाग पाडले).
- तेली समाजाचे आराध्य दैवत, संत तुकाराम महाराजांचे पट्टशिष्य संताजी जगनाडे महाराज यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करावे या मागणीसाठी अशासकीय ठराव, राज्य शासनाने केंद्राकडे शिफारस केली तिकीट प्रकाशित झाले.

- वीज मंडळ कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबतच्या विषयासंदर्भात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा या आयुधांच्या माध्यमातून शासनाने लक्ष वेधले.
- मन्नेवार—मन्नेपवार समाजाच्या मागण्यांकडे तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले. चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अनुसूचित जाती व जमातीच्या नागरिकांना जातीच्या प्रमाणपत्रासाठी ५० वर्षाचा रहिवासी पुरावा देण्याची अट शिथिल करण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला.
- संपूर्ण चंद्रपुर जिल्ह्यात दारूबंदी.
- बेलदार समाजाच्या जातीच्या प्रमाणपत्रांचा प्रलंबित प्रश्न दिनांक २ मार्च २००९ रोजी विशेष परिपत्रक काढून निकाली काढण्यात मिळालेले यश.
- बल्लारपूर तालुका निर्मितीची प्रतिज्ञा पूर्ण. १९९९ मध्ये बल्लारपूर तालुक्याची निर्मिती.
- १८५८ च्या स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेले वीर योध्दा बाबूराव पुलेश्वर शेडमाके यांच्या स्मृतीप्रित्यर्थ टपाल तिकीट प्रकाशित करण्याच्या प्रक्रियेत मिळालेले यश.

### ३.३.२ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे पर्यावरणक्षेत्रातील ठळक कार्य

- झुडपी जंगलांच्या प्रश्न व त्यातून निर्माण झालेलया समस्यांबाबत अशासकीय ठराव, दुरदर्शनवरील अश्लील कार्यक्रमांवर व जाहिरातीवर बंदी घालण्याबाबत अशासकीय ठराव
- विदर्भातील कोळसा खाणी, उद्योग यांच्यामुळे होणाऱ्या प्रदूषणावर प्रतिबंध घालण्याबाबत अशासकीय ठराव
- राज्यातील भूगर्भातील शुध्द पाण्याची पातळी खालावत चालल्यामुळे निर्माण झालेल्या संकटाबाबत अर्धा तास चर्चा.
- बल्लारपूर पेपरमिलमुळे होणाऱ्या प्रदूषणावर प्रतिबंध घालण्याबाबत अर्धा तास (बल्लारपूर पेपरमिलमुळे होणाऱ्या प्रदूषणावर प्रतिबंध घालण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील पेपरमिलला ४ कोटीचे प्रदूषण नियंत्रण संयंत्र लावण्यात भाग पाडले).
- चंद्रपूर जिल्ह्यातील फ्लोराईडयुक्त पाण्याच्या समस्येबाबत अर्धा तास चर्चा—पडोली येथील पाणी पुरवठा योजनेचा प्रस्तावाला विशेष बाब म्हणून मंजूर देण्याचे आश्वासन

### ३.३.३ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे शैक्षणिकक्षेत्रातील ठळक कार्य

- ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या खालावलेला दर्जा उंचावण्याबाबत अशासकीय ठराव
- चंद्रपूर जिल्ह्यातील १४३ शाळांना अनुदान मिळण्याबाबतच्या समस्येसंदर्भात अर्धा तास चर्चा
- सर्व शिक्षा अभियानातील विषयतंज्ञांना सेवेत कायम करावे आणि विषयतज्ञाांचे मासिक मानधन पूर्ववत १० हजार पूरपये करण्याबाबतच्या विषयासंदर्भात अर्धा तास चर्चा, विषयतंज्ञांचे मानधन पूर्ववत १० हजार रूपये करण्यास शासनाला भाग पाडले.
- राज्यातील १० शाळा न्यायाधिकरणातील सुमारे १० हजार प्रकरणे निर्णयासाठी प्रलंबित असणे, पीठासीन अधिकाऱ्यांची पदे रिक्त असणे, याबाबत अर्धा तास चर्चा (चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार चंद्रपूर येथील शाळा न्यायाधिकरणात ११ मार्च २००४ रोजी पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती)
- नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव देण्यात यावे व अमरावती विद्यापीठाला संत गाडगे बाबांचे नांव देण्यात यावे यासाठी अशासकीय ठराव.
- चंद्रपूर शहरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सेवेत रूजू.

- बल्लारपूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था उपलब्ध होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश, औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रशिक्षणार्थ्यांच्या सेवेत रुजू

### ३.३.४ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे औद्योगिकक्षेत्रातील ठळक कार्य

- चंद्रपूर तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राला 'डी प्लस' झोनचा दर्जा देण्याबाबत प्रयत्न.
- चंद्रपूर येथील महाराष्ट्र इलेक्ट्रोस्मेल्ट लिमी. या उद्योगावर वीज दरवाढीच्या संकटामुळे बंदीचे सावट आल्याबाबत अर्धा तास चर्चा
- चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार एमईएलला वीजदरा संदर्भात सवलती देण्यात आल्या
- विदर्भातील लघु उद्योगांना कोळशाचा पुरवठा व्हावा या मागणीसाठी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून प्रयत्न.
- राज्यातील ४२ नगर परिषदांकडे असलेले शॉप ॲक्ट अंमलबजावणीचे काम शासनाकडे वर्ग करण्याबाबतच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत अर्धा तास चर्चा. या चर्चेदरम्यान दिलेलया आश्वासनानुसार शॉप ॲक्ट अंमलबजावणीचे काम शासनाकडे वर्ग झाले.
- मजरा (त. वरोरा) येथील व्हिडिओकॉन इंडस्ट्रीज लिमी. या कारखाना बंद झाल्याने कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी या विषयाबाबत लक्षवेधी, तारांकितप्रश्न, अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले.
- गडचिरोली जिल्ह्यात खनिज व वनसंपदेवर आधारित उद्योग उभारण्याबाबत व गडचिरोली जिल्ह्याचे औद्योगिक धोरण तयार करण्याबाबत विषयासंदर्भात अर्धा तास चर्चा.....?
- चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रांसाठी बाहेर पडणारी फ्लाय ॲश उद्योजकांना वापरासाठी मिळावी यासाठी अधा तास चर्चा फ्लाय ॲशच्या वापरासंदर्भात जिल्हास्तरीय समितीचे गठण.
- कल्पवृक्ष मार्केटींग, संचयनी, समृध्दी व तत्सम इन्व्हेस्टमेंट—फायनान्स कंपन्यांच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांची झालेली फसवणूक व ठेवीदारांच्या रकमा परत मिळाव्या या मागणीसाठी अर्धा तास चर्चा.

### ३.३.५ श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे आरोग्यक्षेत्रातील ठळक कार्य

- विदर्भात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात जपानी मेंदुज्वराच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणावर बालके दगावल्याच्या समस्येला लक्षवेधी सूचनेद्वारे वाचा फोडली.
- राज्यातील सिकलसेल या आजाराच्या प्रादुर्भावावर प्रतिबंध घालण्याबाबात अर्धा तास चर्चा या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार विविध उपाययोजना कार्यान्वित, चंद्रपूर जिल्ह्यासाठी अडची लाख रूपये निधी उपलब्ध
- बल्लारपूर शहरात खासदार विजय दर्डा यांच्या खासदार निधीतून शववाहिका व रूग्णवाहिका उपलब्ध.
- बल्लारपूर येथे ग्रामीण रुग्णालाय निर्मितीसाठी विशेष बाब म्हणून मंजूरी.
- बल्लारपूर येथे पोस्टमार्टम गृहाची उपलब्धी.
- बल्लारपूर तालुक्यात मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन, शिबिरात ०७ हजार रूपयांची तपासणी, या शिबिरात पात्र रूग्णंना मोफत चष्मे वाटप, मोतिबिंदू शस्त्रिक्रिया बल्लारपूर, बामणी, विसापूर येथील नेत्ररूग्णांना शिबिराचा लाभ.
- घुग्घूस येथील जनतेच्या सेवेत रुग्णवाहिका उपलब्ध.

## ४.० निष्कर्ष

सुधारणांतून परिवर्तन आणि क्रांतीच्या मार्गाने परिवर्तन या दोन भिन्न गोष्टी आहेत. सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या नेतृत्वगुणांच्या माध्यमातुन व आपल्या कार्यामुळे केवळ विदर्भच नव्हे तर संपूर्ण

महाराष्ट्र व देशाच्या राजकारणाला दिशा दाखवली आहे. त्यांनी प्रसंग आणि परिस्थितीप्रमाणे कायदेशीर मार्गाने आपल्या कार्यक्षेत्रात सामाजिक, पर्यावरण, शैक्षणिक, औद्योगिक व आरोग्य क्षेत्रात अविरतपणे कार्य करून परिवर्तन घडवून आणले आहे. त्यांच्या कार्यशैलीवरून सार्वजनिक प्रश्न सोडविणे, त्यासाठी विविध सांधनांचा उपयोग करणे, परवितर्नाच्या प्रक्रियेस दिशा व वेग देणे त्यातून प्रत्येक गोष्ट युद्धपातळीवर आणि गतिमान पद्धतीने अमलात आणून गतिमान परिवर्तन घडवून आणण्याकडे सुधीर मुनगंटीवार यांचा कल असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रमाणे विकासाचा मर्यादित अर्थ म्हणजे 'आर्थिक विकास' नसुन, समाजातील विविध घटकांपर्यत विकासाचे लोण पोहोचवणे हे त्यांचे उद्दिष्ट असल्याचे दिसुन येते.

## ५.० आधार ग्रंथसूची


- कुंडले म.बा., कुळकर्णी दामोदर दिनकर, 'शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक मानसशास्त्र' प्रकाशक – महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, श्री विद्या प्रकाशन २५०, शनिवार पेठ, अष्टपूजा रस्ता पुणे ३०, पृ.क्र. २८–२९.
- घोरमोडे, के. यु. व घोरमोडे कला, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्याप्रकाशन, नागपूर २००८.
- ठोंबरे विद्या,वा. नीतीमूल्ये व शिक्षण, नूतन प्रकाशन, पुणे ३०, १९९६, पृ. ८.
- देव वि.प्र. सत्ता राज्यजिज्ञासा, प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१६, पान क्रं. ५४९
- व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास (संपा.), 'राज्यशास्त्र कोश', दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १८७, पृ. २४७
- बोराळकर कृ.दि., 'आधुनिक राजकीय विश्लेषण', पिंपळापूरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, १९९२, पृ. १२० ते १२१
- इनामदार ना.रा. व वकिल अ.क., 'आधुनिक राजकीय विश्लेषण', शुभता–सारस्वत प्रकाशन प्रा. लि., पुणे, १९८४, पृ. ९१–९२
- घांगरेकर चि.ग., 'तुलनात्मक राज्यशास्त्र आणि शासन', दत्त सन्स, नागपूर, १९९०, पृ. २१
- गर्दे डि.के. व बाचल व्ही.एम., 'आधुनिक राजकीय विश्लेषण', भाग १ व २, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, १९७९, पृ. ९३
- Mukhi H.H., "Political Sociology", SBD Publishers, Distributors, Delhi, 2003, p. 163.
- Sharms Urmila and Sharma S.K., "Principles and Theory of Political Science", Altantic Publisher and Distributors, New Delhi, 2000, p. 337.